अमृतमहोत्सवी
स्थापना १९३९
७५ अमृतमहोत्सवी दैनिक
# पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
सातारा
सोमवार । दि. ९ नोव्हेंबर २०१५ ।

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## क्रीडा स्पर्धा विद्यार्थ्यांना बलशाली बनविण्याचे व्यासपीठ : किशोर बर्गे

**कोरेगाव : प्रतिनिधी**

शालेय व महाविद्यालयीन काळात मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. एकप्रकारे मैदानी क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांना बलशाली बनविण्याचे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन कोरेगाव खरेदी-विक्री शेतकरी संघाचे संचालक किशोर बर्गे यांनी केले. येथील रयत शिक्षण संथेच्या डी. पी. भोसले कॉलेजच्यावतीने ५३ वी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी क्रिडा स्पर्धा पार पडली. यावेळी ते बोलत होते. स्पर्धेचे उद्‌घाटन रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी सहसचिव प्राचार्य दिनानाथ पाटील, क्रिडा विभाग प्रमुख डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते. कॉलेजचे प्राचार्य विजयसिंह सावंत यांनी पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कोरेगाव विकास मंचच्यावतीने महाविद्यालयास क्रिडा उपयोगी साहित्य भेट दिले. किशोर बर्गे, रामचंद्र बोतालजी, कार्याध्यक्ष दिलीपराव बर्गे, विठ्ठल काटे यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंना सन्मान चिन्ह देवून गौरवण्यात आले. यावेळी प्रा. बाळासाहेब भोसले, प्रा. जे. एच. शिंदे, प्रा. बी. एस. चव्हाण, कल्याण बर्गे, प्रा. देशमुख, आर. के. मुल्ला, अधिक जाधव, किसनराव बर्गे यांच्यासह खेळाडू, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.



**खेळाडूंना सन्मान चिन्ह देताना किशोर बर्गे शेजारी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, रामचंद्र बोतालजी, दिलीपराव बर्गे, विठ्ठल काटे व इतर.**